वाचा :- १.संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. १९, दि. १८.०३.१९९८.

---

स्था.१८/ब/अहवाल शाखा/वलेप अहवाल/न.क्र.१५६/२०१७

**स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**सहावा मजला, कोंकण भवन,**
**नवी मुंबई ४००६१४.**

**स्थायी आदेश क्रमांक ९८ / २०१७, दि.** 29 DEC 2017

विषय :- जिल्हा परिषद व पंचायत समिती आक्षेप अनुपालन स्विकृतीबाबत.

प्रस्तावना-

उपरोक्त वाचा मधिल क्र. १ च्या कार्यालयीन आदेशाच्या परिच्छेद क्र.३ वर जिल्हा परिषद विभागाचे प्रलंबित अनुपालन सादर करतानां अनुपालनावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरी असणे आवश्यक आहे, असे आदेशित करण्यांत आलेले आहे.

परंतु ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दि.२ मे २००० अन्वये जिल्हा परिषदेच्या कृषी विभाग, बांधकाम विभाग, पशु संवर्धन विभाग, समाजकल्याण विभाग व लघुसिंचन विभाग या विभागांचे कामकाज अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे. ज्या विभागांचे कामकाज अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे आहे अशा विभागांकडील प्रलंबित परिच्छेदांची अनुपालने अतिरिक्त कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सादर झाल्यास, अशी अनुपालने पुढील कार्यवाहीसाठी स्विकारावीत किंवा कसे याबाबत जिल्हास्तरावरुन विचारणा होत आहे. तदनुसार जिल्हा परिषद विभागांच्याबाबतीत अनुपालने सादर करण्याबाबत पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**आदेश**

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा, अधिनियम १९३० मधील नियम १० मध्ये नमुद केल्या प्रमाणे अहवाल मिळाल्यानंतर अहवालात निर्देशनास आणून दिलेले असतील असे कोणतेही दोष किंवा नियमबाह्यता **सभापतीने** सुधारल्या पाहिजे आणि अशा अहवालाच्या बाबतीत केलेल्या किंवा प्रस्तावित केलेल्या कार्यवाहीसंबंधिचे निवेदन आणि त्याबाबतचे स्पष्टीकरण यासह तो अहवाल स्थानिक प्राधिकरणाच्या बैठकीपुढे मांडला पाहिजे, तसेच त्यांनी असा अहवाल मिळाल्यापासून ४ महिन्याच्या आत त्यामध्ये असलेले दोष किंवा नियमबाह्यता लेखा परिक्षकाला कळविल्या पाहिजेत, अशी तरतूद आहे.

उक्त नियमातील सभापती म्हणजे अधिनियम १९३० मधील नियम ३ (अ-अ) नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या, अधिनियम १९६१ अन्वये स्थापन करण्यात आलेली जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती यांच्या बाबतीत त्या अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी होय.

यास्तव पंचायत समिती व जिल्हा परिषद विभागांच्या प्रलंबित परिच्छेदांची अनुपालन विवरणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीनेच सादर करावीत असे सूचित करण्यांत येत आहे. उपरोक्त विषयास अनुसरुन यापुर्वी निर्गमीत स्थायी आदेश प्रस्तुत आदेशाद्वारे अधिक्रमित करण्यांत येत आहेत.

सदर आदेशातील सुचनांचे काटेकोर पालन होईल याबाबत दक्षता घ्यावी.

**(प्रताप मोहिते),**
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

**प्रत उचित कार्यवाहीस्तव :-**

सर्व सहसंचालक, विभागीय कार्यालये. सहाय्यक सहाय्यक संचालक सर्व जिल्हा कार्यालये.